# 1 ली मध्ये जाणाऱ्या पाल्यांसाठी शाळानिवडीचे डिसिजन मेट्रिक्स




आपल्या पाल्यासाठी कोणती  शाळा कोणती निवडावी? शिकण्याचे माध्यम कोणते असावे ? असे अनेक प्रश्न पालकांना  पडत असतात. जेंव्हा आपले मुल पहिल्यांदाच शाळेत जाण्याच्या वयात येते तेंव्हा तर अनेक पालक काळजीत पडतात. अशा काळजीत असणारे पालक मला अनेकदा फोन करतात किंवा मेसेज करतात आणि विचारतात की, “ सर, माझ्या मुलांसाठी कोणती शाळा निवडू?”.  अशा पालकांना मार्गदर्शन करत असताना मला वाटले की याबाबत पालकांसाठी डेटा ड्रिव्हन  डिसिजन मेट्रिक्स बनवावे जे त्याना शाळेची निवड करण्यासाठी उपयुक्त ठरेल. हे डिसिजन मेट्रिक्स मुख्यत्वे पहिलीच्या वर्गात प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या पाल्यांच्या पालकांसाठी आहेत.

निर्मिती: रणजितसिंह डिसले, ग्लोबल टीचर विजेते

# शाळा निवडताना कोणते निकष वापराल?

## 1 ली च्या वर्गात जाणाऱ्या पाल्याच्या शाळा- निवडीसाठी निकष

### भाग 1

या भागात एकूण 5 निकष असून जास्तीत जास्त 25 गुण देता येतील. गुण देण्याचे निकष खालीप्रमाणे आहेत. एका निकषाला जास्तीत जास्त 5 आणि कमीत कमी 2 गुण देता येतील. कोणत्याही निकषाला 0 आणि 1 गुण देता येणार नाहीत.

| निकष | 5 | 4 | 3 | 2 |
|---|---|---|---|---|
| **अंतर** (घर ते शाळा) | 0 - 1.5 किमी/ 30 मिनिटांपेक्षा कमी एकेरी अंतर | 1.5 - 3 किमी/ 31-45 मिनिटे एकेरी अंतर | 3 -5 किमी/ 46 ते 1.5 तास एकेरी अंतर | 5 किमी पेक्षा जास्त एकेरी अंतर |
| **माध्यम** | मातृभाषा | सेमी | मातृभाषा व्यतिरिक्त इतर भाषेतून शिक्षण | लागू नाही |
| **शिक्षक** | 5+ वर्षांचा इयत्ता 1ली ला शिकवण्याचा अनुभव | 3 -5 - वर्षांचा इयत्ता 1ली ला शिकवण्याचा अनुभव | 2 -3 वर्षांचा इयत्ता 1ली ला शिकवण्याचा अनुभव | 2 पेक्षा कमी वर्षांचा इयत्ता 1ली ला शिकवण्याचा अनुभव |
| **फी** | फी तुमच्या एका महिन्याच्या वेतना पेक्षा कमी | फी तुमच्या एका महिन्याच्या वेतनाइतकी | फी तुमच्या 1 -3 महिन्याच्या वेतनाइतकी | फी तुमच्या 3-5 महिन्याच्या वेतनाइतकी |
| **शाळा** भौतिकदृष्ट्या | -शाळेचे दृश्यात्मक स्वरूप<br>-वर्गखोलीची रचना<br>-वर्गखोलीतील बैठक व्यवस्था<br>-शालेय व्यवस्थापनाच्या कार्यप्रणालीतील पारदर्शकता ,<br>-खेळण्यासाठी पुरेशी जागा<br>हे पाचही निकष पूर्ण | -शाळेचे दृश्यात्मक स्वरूप,<br>-वर्गखोलीची रचना,<br>-वर्गखोलीतील बैठक व्यवस्था,<br>-शालेय व्यवस्थापनाच्या कार्यप्रणालीतील पारदर्शकता ,<br>-खेळण्यासाठी पुरेशी जागा<br>यापैकी कोणतेही 4 निकष पूर्ण | -शाळेचे दृश्यात्मक स्वरूप,<br>-वर्गखोलीची रचना,<br>-वर्गखोलीतील बैठक व्यवस्था,<br>-शालेय व्यवस्थापनाच्या कार्यप्रणालीतील पारदर्शकता ,<br>-खेळण्यासाठी पुरेशी जागा<br>यापैकी कोणतेही 3 निकष पूर्ण | -शाळेचे दृश्यात्मक स्वरूप,<br>-वर्गखोलीची रचना,<br>-वर्गखोलीतील बैठक व्यवस्था,<br>-शालेय व्यवस्थापनाच्या कार्यप्रणालीतील पारदर्शकता ,<br>-खेळण्यासाठी पुरेशी जागा<br>यापैकी कोणतेही 2 निकष पूर्ण |

# शाळा निवडताना कोणते निकष वापराल?

## 1 ली च्या वर्गात जाणाऱ्या पाल्याच्या शाळा- निवडीसाठी निकष

### *भाग 2*

या भागातील निकष वर्णनात्मक असून प्रत्येक निकषांना गुण देणे काहीसे अवघड आहे. कारण हे व्यक्तिनिष्ठ निकष आहेत. प्रत्येक व्यक्ती हे निकष लावेलच हे सांगता येत नाही. त्यामुळे सर्वसमावेश वस्तुनिष्ठ गुणनिश्चिती करिता येणाऱ्या संभाव्य अडचणी टाळण्याच्या दृष्टीने या भागातील निकषांना गुणदान देण्यात आलेले नाही. मात्र ज्या-ज्या पालकांना हे निकष महत्त्वाचे वाटतात ते याकरिता व्यक्तिनिष्ठ गुणदान करू शकतात.

| निकष | स्पष्टीकरण |
|---|---|
| **पूर्वीचा अनुभव** | ज्या शाळेत तुमच्या मुलाला दाखल करण्याच्या विचारात आहात, त्या शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांशी संवाद साधून 'त्या' शाळेबद्दल अधिक माहिती घेवू शकता. हा संवाद भाग 1 मधील निकष क्रमांक 5 च्या अनुषंगाने असावा. |
| **एकाच शाळेत सर्व अपत्ये दाखल करणे** | एकापेक्षा अधिक अपत्ये असणारे पालक या निकषाकडे जास्त आकर्षित होतात. यामुळे शाळेचे वेळापत्रक आणि पालकांच्या इतर जबाबदाऱ्या यात सुयोग्य संतुलन साधले जाते. |
| **मुलांचा कंफर्ट झोन** | ज्या शाळेत तुमच्या पाल्याने प्रवेश घ्यावा असे वाटते त्या शाळेत त्याला आधी घेवून जावा. शाळांमध्ये 'ओपन डे' असतात. त्या विशिष्ठ दिवशी शाळेत जावून आपल्या पाल्याला शाळेची एक सफर घडवून आणावी. यातून त्याला शाळेच्या वातावरणाशी लवकर जुळवून घेणे सोपे होते. |
| **भविष्यातील करियर च्या दृष्टीने पायाभरणी** | असे दिसून आलेले आहे की मिलिटरी, आरोग्य सेवा, परदेशातील शिक्षण यांसारख्या भविष्यकालीन योजनाची पायाभरणी म्हणून विशिष्ट शाळांची - मिलिटरी स्कूल, केंद्रीय विद्यालय, निवड केली जाते. |